कार्यालय
# नगर परिषद नागभीड
ता. नागभीड जि. चंद्रपूर
Email- mcnagbhid@gmail.com फोन नं-07179-240170

जा.क्र.नपना/सा.प्र.वि./२०२५/९३८६ दि. २८/०६/२०२५

प्रति,

मा. व्यवस्थापक,
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
सिविल लाईन नागपूर-440001

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, 2015 अंतर्गत अधिसुचित केलेल्या सेवांचा तपशिल शासन राजपत्रात प्रसिद्ध करणेबाबत.**

**संदर्भ :-** 1. **नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण**-0922/**प्र.क्र.**32/**नवि** 32, **दिनांक** 09 **जानेवारी**, 2024
2. **मा. उप आयुक्त, न.प. प्रशासन संचालनालय यांचेकडील परिपत्रक नपप्रसं/का**08/DUTD/RTS/2023 /5662, **दिनांक** 17/10/2023

महोदय,

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, 2015 च्या प्रभावी अंमलबजावणीच्या अनुषंगाने महत्वाच्या सेवा व्यापक लोकहिताच्या दृष्टिने लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्याबाबत संदर्भ क्र. 1 वरील शासन निर्णयान्वये शासनाने निर्देश दिले आहेत.

त्याचप्रमाणे अधिसूचित केलेल्या लोकसेवा व अन्य बाबीचा तपशील नागरीकांना उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्याने तसा तपशील प्रसिद्ध करणेबाबत संदर्भ क्र. 2 वरील परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने नागभीड नगरपरिषदेच्या अधिसूचित करण्यात आलेल्या लोकसेवाबाबतचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र 01 यासोबत जोडले असून सदर विवरणपत्र महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात यावे, तसेच प्रसिद्धीचे बिल, प्रसिद्धीच्या 10 प्रतीसह या कार्यालयाकडे सादर करण्यात यावे, ही विनंती.

**सहपत्र:- विवरणपत्र 01**

मुख्याधिकारी
नगर परिषद नागभीड

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, नागभीड**

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

# नगर परिषद नागभीड जि. चंद्रपूर

## प्राधिकृत प्रकाशन

## मुख्याधिकारी तथा प्रशासक यांचेकडून

# जाहीर प्रसिद्धीकरण

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेवून त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश करण्यामागे दिनांक २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेश निर्गमित करण्यामागे सर्वाजनिक प्राधिकरणाने पूर्वी असलेल्या सेवा अधिनियमांतर्गत अधिसूचित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे. त्यामध्ये नगरपरिषद या नागरी स्थानिक संस्थांचा समावेश आहे. नागरी संस्थांमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा - सुविधांपैकी नागरिक केंद्रबिंदू मानून, नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त फायदा घेतलेला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत, अशा सेवा अध्यादेशाच्या कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एमसीओ-२०१५/प्र.क्र. १८९/नवि १४, दिनांक २३/०६/२०१५ नुसार मा. शासनाने निर्णय घेतला आहे.

मा. शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार एकुण ७१ सेवा स्थानिक प्राधिकरणांनी अध्यादेशाचे कलम ३ (अ) नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत. परंतु त्यापैकी ०५ सेवा या फक्त महानगरपालिकेकरिता लागू असल्याने असल्यामुळे नागभीड नगरपरिषदेकडून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांची संख्या ६६ इतकी होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ कलम ३ अन्वये सदर ६६ लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व व्दितीय अपिलिय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आले आहे. नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या सेवांची यादी https://mahaulb.in/PortalSite/#/app/home या वेब पोर्टल वर व नगरपरिषद नागभीड कार्यालयाच्या नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**स्वा/ -**
**(अर्चना वंजारी)**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद नागभीड**